पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ७**
सभावृत्तात

दिनांक :- ०१ / ०८ / २०१२ वेळ :- दुपारी ०३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०१ / ०८ / २०१२ रोजी दुपारी ०३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.बो-हाडे शुभांगी संजय- सभापती
२) मा.काळजे नितीन प्रताप
३) मा.यमुनाताई रमणनाना पवार
४) मा.उल्हास शेट्टी
५) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
६) मा.लोंढे गणेश नारायण
७) मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८) मा.सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा. गावडे - सहा. आयुक्त, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा.भदाणे- उपसंचालक नगररचना, मा. काची - उपशहर अभियंता, मा.पाटील, मा. ढगे, मा.तांबे - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -**

विषय क्रमांक ८ :- प्र.क्र.५३ मधे म्हातोबानगर , आण्णभाऊ साठे झोपडपट्टी परिसरातील पाणी पुरवठयात सुधारणा करणेबाबत.

विषय क्रमांक ९ :- आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी ( EWS ) गृहनिर्माण प्रकल्पाच्या उर्वरित घरांसाठी धोरण निश्चित करणेबाबत.

विषय क्रमांक १० :- चिंचवड आरक्षण क्र. १८७ उदयान या जागेचे भूसंपादन करणेबाबत - मा. गणेश लोंढे मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ११ :- शहर सुधारणा समितीच्या अधिकाराबाबत - मा. उल्हास शेट्टी, मा. सिमा सावळे यांचा प्रस्ताव.

----------

(अ) दिनांक ०३/०७/२०१२ व १७/०७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

(ब) दिनांक १७/०७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले .

----------

ठराव क्रमांक :- ३७ विषय क्रमांक : १
दिनांक :- ०१/०८/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१अ/१८३/१२ दि. ०२/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे-

मौजे चिंचवड येथील आरक्षण क्र.१८५ विसंगत उद्योग (Non Confirming Industries ) या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागणार असल्याने या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३८ विषय क्रमांक : २
दिनांक :- ०१/०८/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा.सिमा सावळे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/पिंपरी/१२७/२०१२ दि.०३/०७/२०१२
विषय :- मौजे पिंपरी, ता.हवेली येथील सि.स.नं.५७४३ पै.आरक्षण क्रमांक ११० दुकानदारांचे पुनर्वसन या प्रयोजनासाठी भूसंपादन करण्याबाबत.

विषय २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३९ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०१/०८/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा.उल्हास शेट्टी अनुमोदक :- मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/२क/६०/२०१२ दि.०९/०७/२०१२
विषय :- मौजे भोसरी (कासारवाडी) येथील क्रमांक २९ बहुउद्देशीय सभागृह संपादनाबाबत.

विषय ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४० विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०१/०८/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा. नितीन काळजे अनुमोदक - मा. सुरेश म्हेत्रे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि।कावि।च-होली।०१६।१२, दि.१६/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

मौजे च-होली येथील प्रभाग क्रमांक ७ मधील रस्ते व आरक्षण भूसंपादनाबात मा.आमदार व मा.नगरसदस्य यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने प्रस्तावात नमूद विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत खाजगी मिळकतींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदी तसेच भुसंपादन कायदा १८९४ प्रमाणे संपादन करणेस व येणा-या खर्चास
( भूसंपादन अधिकारी कळवतील ती रक्कम) मान्यता देणेकामी तसेच मनपा हद्दीतील मौजे च-होली येथील सर्व रस्त्याबाबत संबंधीतीत जागांचे जागा मालक यांचे मागणी नुसार मंजूर विकास आराखडयातील कोणत्याही रस्त्याची जागा मनपाच्या ताब्यात घेत असताना मनपाकडून आकारले जाणारे दर हे वाजवी दरापेक्षा जास्त असल्याने अनेक जागा मालक जागा ताब्यात देण्यासाठी तयार होत नाहीत या हद्दीतील पूर्वपश्चिम ९० मिटर रुंदीच्या रस्त्याबाबत एकही जागामालक मनपाने ठरवून दिलेले खडीमुरुमाचा रस्ता करण्याकरिता असलेला दर जास्त असल्याने जागा ताब्यात देत नाहीत. त्यामूळे या रस्त्याचे विकास कामास अडथळा होत असून सदर दर कमी करुन इतर रस्त्याप्रमाणेच हा खडीमुरुमा पर्यत ( WBM रस्ता) करणेत यावा व मनपाच्या ताब्यात देण्यासाठी र.रु.१४४०/- प्रति चौरस मिटर हा खर्च रद्द करणेत यावा यास मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पााठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४१ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०१/०८/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा.गणेश लोंढे अनुमोदक :- मा.उल्हास शेट्टी
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि।कावि।रहाटणी।४९३।१२, दि.२०/०७/२०१२
विषयः- मौजे रहाटणी (काळेवाडी) ता.हवेली ,जि.पुणे येथील प्रस्तावित रस्त्यांखालील जमिनीचे भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली -**

सूचक :- मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा.सिमा सावळे

गुरुवार दिनांक ०२/०८/२०१२ रोजी दुपारी १२.०० पर्यत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती :- गुरुवार दिनांक ०२/०८/२०१२ रोजी दुपारी १२.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिति
**कार्यपत्रिका क्रमांक - ७**
सभावृत्तात
( दिनांक ०१/०८/२०१२ ची तहकूब सभा)

दिनांक :- ०२ / ०८ / २०१२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०१/०८/२०१२ ची तहकूब सभा गुरुवार दिनांक ०२ / ०८ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.बो-हाडे शुभांगी संजय- सभापती
२) मा.काळजे नितीन प्रताप
३) मा.उल्हास शेट्टी
४) मा.प्रशांत शितोळे
५) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
६) मा.लोंढे गणेश नारायण
७) मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८) मा.सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा. गावडे - सहा. आयुक्त, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा. काची - उपशहर अभियंता, मा. पाटील, मा. ढगे, मा. तांबे , मा. जाधव - कार्यकारी अभियंता, मा. शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक :- ४२ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २/०८/२०१२ विभाग - पाणीपुरवठा ब प्रभाग
सुचक :- मा. उल्हास शेट्टी अनुमोदक :- मा. सुरेश म्हेत्रे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.बप्र।पापु।कावि।७३८।१२, दि.२३/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे-

प्रभाग क्र.४३ मध्ये मिलिंदनगर, आदर्शनगर, सुभाषनगर झोपडपट्टी परिसरातील पाणीपुरवठयात सुधारणा करणेकामी जलवाहिनी टाकणे तसेच जुन्या जलवाहिन्या बदलून नविन

जलवाहिन्या टाकणेकामी र.रु.५०,००,०००/- ( अक्षरी र.रु. पन्नास लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४३ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २/०८/२०१२ विभाग - पाणीपुरवठा ब प्रभाग
सुचक :- मा.सिमा सावळे अनुमोदक :- मा. नारायण बहिरवाडे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.बप्र।पापु।कावि।७४७।१२, दि.२४/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे-

जलक्षेत्र क्र.बी./१ अंतर्गत एम.बी.कॅम्प किवळे येथील घोंषित झोपडपट्टी भागात पाणीपुरवठयात सुधारणा करण्यासाठी नवीन डी.आय.पाईपलाईन टाकणेकामी र.रु. ५०,००,०००/- ( अक्षरी र.रु. पन्नास लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-**

ठराव क्रमांक :- ४४ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २/०८/२०१२ विभाग - पाणीपुरवठा ब प्रभाग
सुचक :- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा. सिमा सावळे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.बप्र।पापु।कावि।७७९।१२, दि.३१/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे-

प्रभाग क्र.५३ मध्ये म्हातोबानगर, आण्णाभाऊ साठे नगर झोपडपट्टी परिसरातील पाणी पुरवठयात सुधारणा करणेकामी जलवाहिनी टाकणे तसेच जुन्या जलवाहिन्या बदलून नविन जलवाहिन्या टाकणेकामी र.रु. ५०,००,०००/- ( अक्षरी र.रु. पन्नास लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४५ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २/०८/२०१२ विभाग - स्थापत्य EWS प्रकल्प
सुचक :- मा. उल्हास शेट्‌टी अनुमोदक :- मा. नितीन काळजे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था।EWS।१२८।२०१२, दि. ३०/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी प्रस्तावात सविस्तर नमुद प्रमाणे २३०० घरे पूर्ण करावयाची झाल्यास महानगरपालिकेचा निश्चित हिस्सा १६.१४ कोटी इतका असणार आहे. परंतु निविदा दर वाढीव आले तर ती रक्कम, लाभार्थ्यांचा सध्या घेतला जाणारा हिस्सा र.रु.३,७६,०००/- पेक्षा जास्त येत असेल तर तो वाढीव खर्च महानगरपालिकेने सोसावा की लाभार्थ्यांनी या विषयी घोरणात्मक निर्णय घेणेची

मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली आहे त्यामध्ये चिखली गायरान मधील २ हेक्टर जागा EWS साठी राखीव आहे. त्या ठिकाणी सुध्दा या प्रकल्पांतर्गत EWS चीच घरे घ्यावीत. जागा मनपाच्या ताब्यात आहे. तेथील झाडे काढून प्रकल्प राबवावा. तसेच मनपाने येत्या तीन ते चार महिन्यात ताब्यात येणारी सर्व EWS संबंधिची आरक्षणे यावर सुध्दा EWS प्रकल्पांतर्गत घरांचे नियाजन करावे. बांधकाम खर्चाचा हिस्सा लाभार्थ्यांकडून र.रु.३,७६,०००/- घेण्याचे मा.महापालिका सभा ठ.क्र.९९९, दि.२०/०९/२०१० अन्वये मान्य झालेले आहे. त्याप्रमाणेच यापुढेही लाभार्थ्यांकडून हिस्सा घ्यावा. त्यामध्ये वाढ करु नये व प्रकल्प त्वरेने पूर्ण करावा. सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेनंतर निविदा रकमेपेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास प्रत्यक्ष येणा-या खर्चास अनुसरुन प्रकल्पतील मुळ सुविधेत बदल न करता त्याचा फायदा लाभार्थ्यांना देण्यात यावा. तसेच या पुढील प्रकल्पात प्रत्येक मजल्यावर lift चा थांबा ठेवण्यात यावा. तसेच सदरची योजना सुसाध्य (viable) होणेकामी नगरविकास विभाग यांचे दिनांक २४/१२/२००८ च्या आदेशानुसार १५% चटई निर्देशांकाच्या विक्री घटकातून निधी उभारावा या प्रमाणेचा समावेश करुन त्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४६ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २/०८/२०१२
सुचक :- मा. गणेश लोंढे अनुमोदक :- मा. नितीन काळजे
संदर्भ :- मा. गणेश लोंढे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव -

चिंचवड आरक्षण क्र. १८७ उद्यान या जागेचे भूसंपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४७ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- २/०८/२०१२
सुचक :- मा. उल्हास शेट्टी अनुमोदक :- मा. सिमा सावळे
संदर्भ :- मा. उल्हास शेट्टी, मा.सिमा सावळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपा शहर सुधारणा समिती या समितीच्या अधिकारामध्ये खालीलप्रमाणे विविध विभागांच्या कामांबाबत त्या विभागांचा कार्यअहवाल या समितीस मंजूरीसाठी पाठविण्यात यावा व या विभागांमध्ये मनपाच्या खालील विभागांचा समावेश असावा. वैद्यकीय विभाग, आरोग्य विभाग, भूमि - जिंदगी विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन विभाग, पाणीपुरवठा विभाग, मलनि:सारण विभाग, जकात विभाग, करसंकलन विभाग, विद्युत विभाग, पर्यावरण विभाग या विभागांच्या कामांचा कार्यअहवाल समितीस पाठविणेत यावा. तसेच शहर विकासाच्या अंमलबजावणीकामीचा कोणत्याही

स्वरुपाचा धोरणात्मक निर्णय हा शहर सुधारणा समितीच्या मंजूरीकरीता पाठविणेकामी संबंधीत विभागांनी प्रशासकीय कार्यावाही करावी यांस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / १०५९ / २०१२
दिनांक :- ०३ / ०८ / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१/shsu-११-१२\proceeding७doc